SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
PHONE : EPAX-2690571, 293730
FAX : 0091-0231-2691533 & 0091-0231-2692333 Affl. Ext. 9089, 9090
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६९०५७१ (विस्तारीत क्रमांक - ९०८९, ९०९०)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

"A"
Re-accredited by
NAAC (2014)
With CGP-A 3.16

जा.क्र. संलग्नता/टे.१/लोहार/ 10496 दिनांक : 12 JAN 2016

प्रति,
मा. प्राचार्य / मा. संचालक,
अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालये/ मान्यताप्राप्त शिक्षण संस्था.

**विषय :-** अशासकीय विनाअनुदानित व्यावसायिक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, शासनाच्या दि.०५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयामध्ये शासकीय/अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत आढावा समित्यांचे गठन तसेच इतर मार्गदर्शक सुचनांचे विस्तृत विवेचन केले आहे. परंतु त्यामध्ये अशासकीय विनाअनुदानित तसेच व्यावसायीक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत आढावा समिती अथवा मार्गदर्शक सुचनांचा समावेश केलेला नाही. महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापकांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादा वाढविण्यासंदर्भात अडचणी निर्माण होत आहेत.

तथापी उक्त शासन निर्णयामध्ये मुद्दा क्र.९ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद केलेली आहे.

मुद्दा क्र.०९ **अकृषी विद्यापीठाशी संलग्नित/महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्नित अशासकीय (कायम विनाअनुदानित) शैक्षणिक संस्थामधील अध्यापक /प्राचार्य यांना मुदतवाढ देण्याबाबतचा निर्णय संबंधित संस्थेने त्यांच्या स्तरावर घ्यावा.**

तथापी उपरोक्त तरतुदीनुसार संस्थेने मुदत वाढ देवून प्रस्ताव विद्यापीठास सादर केलेने तसेच संस्थेने केलेल्या कार्यावाहीस विद्यापीठाकडून मान्यता घेणे क्रमप्राप्त असलेने सदर विषय विद्यापीठ अधिकार मंडळापुढे विचारार्थ ठेवणेत आला होता. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार आपणास कळविण्यात येते की, **अशासकीय विनाअनुदानित तसेच व्यावसायीक महाविद्यालयातील प्राचार्य व अध्यापक पदाच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्यासाठी संबंधित संस्थेने त्यांच्या स्तरावर शासनाच्या दि.२३/११/२०११ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार निकष तपासण्याकरिता खालील प्रमाणे आढावा समिती गठीत करावी.**

**१). संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/संस्था अध्यक्ष - अध्यक्ष**
**२). संबंधित विषयातील दोन विषय तज्ञ - सदस्य**
**३). महाविद्यालयातील एक प्रशासकीय सेवक - सदस्य सचिव.**

**सदर समितीपुढे सादर होणारे प्रस्ताव हे सोबत जोडलेल्या तक्ता "अ" (प्राचार्य पदासाठी) व तक्ता "ब" (अध्यापक पदासाठी) मधील निकषानुसार छाननी करुन पुरावा कागदपत्रासह प्रस्ताव समितीच्या शिफारशीसह विद्यापीठाकडे मान्यतेसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावे. यानंतर विद्यापीठाकडून त्यांना मान्यता देण्याची कार्यवाही करणेत येईल.**

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ
विकास मंडळ

सोबत : वरील प्रमाणे.

**सदरचे परिपत्रक सर्व संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणण्यात यावे. तसेच सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर BCUD मध्ये Affiliation T.1 Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.**

# तक्ता " अ "

अशासकीय विनाअनुदानित तसेच व्यावसायीक महाविद्यालयामधील प्राचार्यांच्या शैक्षणिक कामकाजाचा आढावा दि..
सेवानिवृत्ती वय ६२ वरून ६५ करणेबाबत

महाविद्यालयाचे नाव :- प्राचार्यांचे नांव :-

| अ. क्र. | पीएच.डी. प्राप्तीचा दिनांक | वैद्यकीय प्रमाणपत्राचा तपशील | गोपनीय अहवालातील प्रतवारी वर्षेनिहाय | महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले किंवा कसे नसल्यास, त्यासाठी कोणते प्रयत्न केले. | महाविद्यालयाचे नॅक/एनबीए या संस्थेकडे मूल्यांकन/पुर्नमूल्यांकन करण्यात आल्याबाबतची माहिती | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेबाबत मागील पाच वर्षाचा आलेख | महाविद्यालयामध्ये प्राचार्यांच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरु केले.(अभ्यासक्रमाच्या नावासह तपशील नोंदवावा ) | महाविद्यालयामध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या. (कृपया तशील वार नोंद करावी ) | महाविद्यालयातील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मच्याऱ्यांची विहित कार्यपध्दतीनुसार बिंदूनामावली तयार करण्यात आलेली आहे किंवा कसे | महाविद्यालया विरुध्द चौकशी प्रलंबित आहे किंवा कसे (असल्यास प्रकरणांची संख्या नोंदवावी ) | महाविद्यालयातील किती अध्यापकांना/ विद्यार्थ्यांना पीएच.डी साठी प्रोत्साहित करण्यात आले |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| | पीएच. डी. पदवी धारण केलेली आहे./ नाही | दिनांक. / /२०१२ च्या वैद्यकीय दाखल्यानुसार शारिरीकदृष्या सक्षम आहेत. | | | मुल्यांकन/ पुर्नमूल्यांकन वर्षे-<br>प्राप्त ग्रेड -<br>मुल्यांकन संस्थेचे नाव- | वर्षे-<br>उत्तीर्ण % | | | | | |

...२//-

| महाविद्यालया मार्फत राज्य/राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले. | राज्य/ राष्ट्रीय /आंतर राष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा चर्चासत्र आयोजित करण्यात आले. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रम राबविण्यात आले. ( उपक्रमाचा तपशील नोंदवावा (संख्येसह) ) | महाविद्यालयास किती पारितोषिके मिळाली | महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे व लघु स्वरुपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. | महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी लॅबोरेटरीज इंडस्ट्रीज, एन. जी.सी व सामाजिक व शैक्षणि संस्था व इतर यांच्यातील समन्वय साधण्यात आला आहे काय (कृपया संस्थेच्या नावासह तपशील नोंदवावा ) | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती टक्केवारी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे एन.सी.सी. मधील योगदान कसे आहे, एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते. | महाविद्यालयामार्फत उच्च शिक्षण सुधारण्याबाबत कोणते नाविण्यपुर्ण उपक्रम राबविले जातात, अभ्याक्रमात कमकुवत विद्यार्थ्यांसाठी कोणती विशेष योजना/प्रयत्न केले जातात. तपशीलवार नोंदवावे | महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे, सदर संकेतस्थळ अद्ययावत ठेवले आहे किंवा कसे, उत्तर होय असल्यास संकेतस्थळाचा क्रमांक नोंदवावा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| आंतरराष्ट्रीय स्तर-<br><br>राष्ट्रीय स्तर-<br><br>राज्य स्तर-<br><br>एकूण- | आंतरराष्ट्रीय स्तर-<br><br>राष्ट्रीय स्तर-<br><br>राज्य स्तर-<br><br>एकूण- | | | मोठे संशाधन प्रकल्पाची संख्या-<br><br>लघु संशाधन प्रकल्पाची संख्या-<br><br>एकूण- | | अं.क्र. स्तर प्रविण्य टक्केवारी | | | |

...३//-

| महाविद्यालया मार्फत रॅगिग कायद्यानुसार सर्व उपाययोजना केल्या आहेत किंवा कसे. | महाविद्यालया मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनामधून/ स्तोत्रामधून मिळालेल्या निधीचा त्याच प्रयोजनासाठी विनियोग केला जातो किंवा कसे | महाविद्यालया-साठी विद्यापीठ अनुदान आयोग, जिल्हा नियोजन व विकास समिती व इतर संस्थाकडून विविध योजनाकरिता किती अनुदान प्राप्त केले याचा तपशील | महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयागशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छतेसंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते | महाविद्या-लयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात. (तपशील नोंदवावा) | महाविद्यालया - मध्ये संगणक प्रणालीचा पुर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे | प्रत्येक शैक्षणिक वर्षात संशोधन मार्गदर्शकाच्या माध्यमातून विविध विषयावरील किती संशोधन शिष्यवृत्तीधारक तयार केले. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल मधून महाविद्यालयातील संधोधकांनी किती शोध निबंध प्रकाशित केले. | एकूण किती संदर्भग्रंथ प्रकाशित करण्यात आले त्यापैकी किती संदर्भग्रंथचा समावेश अभ्याक्रमामध्ये करण्यात आला आहे. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध विषयावरील परिषदामध्ये/ ऑलिपियाड मध्ये शैक्षणिक वर्षात महाविद्यालयातील किती अध्यापकांनी भाग घेतला आहे. | महाविद्यालयाकडून चालविण्यात येणाऱ्या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायभिमुख आहे. | समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ |
| | | १.यु.जी.सी.<br><br>२.डी.पी.डी.सी.<br><br>३.इतर संस्थाकडून प्राप्त रक्कम- | | | | | | प्रकाशित संदर्भ ग्रंथाची संख्या-<br><br>त्यापैकी अभ्याक्रमात समाविष्ट ग्रंथाची संख्या- | | | १)दि. रोजी सेवानिवृत्त झाले आहेत./होत आहेत.<br>२) रकाना क्रमांक ०५ ते ३३ मधील तपशील विचारात घेता शैक्षणिक कामगिरी समाधानकारक नसल्याने /असल्याने सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे. /येत नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष<br>संस्था अध्यक्ष | सदस्य<br>विषयतज्ज्ञ | सदस्य<br>विषयतज्ज्ञ | सदस्य सचिव<br>प्रशासकीय सेवक |

## तक्ता " ब "

**अशासकीय विनाअनुदानित तसेच व्यावसायीक महाविद्यालयातील अध्यापकांचा शैक्षणिक कामकाजाचा आढावा** दि.

**सेवानिवृत्ती वय ६० वरून ६२ करणेबाबत**

**अध्यापकाचे नाव :-** **विषय :-** **महाविद्यालयाचे नाव :-**

| पीएच.डी. प्राप्तीचा दिनांक | वैद्यकीय प्रमाणपत्राचा तपशील | गोपनीय अहवालातील प्रतवारी वर्षनिहाय (मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवाल शेरा व प्रतवारी नोंदवावी) | संशोधनाचे मोठे (Major) व लघु (Minor) स्वरूपाचे किती प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. | विविध स्तरावरील चर्चासत्र /परिसंवाद /कार्यशाळामध्ये किती संशोधन लेख (Research Paper) सादर केले आहेत. | राज्य / राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय किती कार्यशाळा / चर्चासत्रांना उपस्थित राहिले. | अध्यापन करीत असलेल्या विषयातील किती संदर्भ ग्रंथ /क्रमिक पुस्तके प्रकाशित केले आहेत.<br>त्यापैकी किती संदर्भ ग्रंथ/ क्रमिक पुस्तके समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. | अध्यापन करीत असलेल्या विषयाव्यतिरिक्त किती संदर्भ ग्रंथ/ क्रमिक पुस्तके प्रकाशित केले आहेत. -<br>त्यापैकी किती संदर्भ ग्रंथांचा/ क्रमिक पुस्तकांचा समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. - | अध्यापन करीत असलेल्या विषयातील कोणकोणत्या प्राधिकरण / मंडळ / संस्था यावर सदस्य आहेत. | अध्यापन करीत असलेल्या विषय व इतर उपक्रमामध्ये किती पारितोषिके मिळाली आहेत. | राज्य /राष्ट्रीय स्तरावरील किती पूरस्कार प्राप्त झाले | समितीचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ |
| | दिनांक.<br><br>च्या वैद्यकीय दाखल्यानुसार शारिरीकदृष्या सक्षम आहेत. | | मोठे प्रकल्प<br><br>लघु प्रकल्प<br><br>एकूण प्रकल्प | विभागीय<br><br>राज्य<br><br>राष्ट्रीय<br><br>आंतरराष्ट्रीय | विभागीय स्तर<br><br>राज्य स्तरीय<br><br>राष्ट्रीय स्तरीय<br><br>आंतरराष्ट्रीय | किती संदर्भ ग्रंथ /क्रमिक पुस्तके प्रकाशित झाले<br><br>त्यापैकी किती संदर्भ ग्रंथ/ क्रमिक पुस्तके समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. | किती संदर्भ ग्रंथ /क्रमिक पुस्तके प्रंकाशित झाले<br><br>त्यापैकी किती संदर्भ ग्रंथ/ क्रमिक पुस्तके समावेश अभ्यासक्रमामध्ये करण्यात आला आहे. | | | राष्ट्रीय<br><br>राज्य<br><br>एकूण | १)दि. रोजी सेवानिवृत्त होत आहेत.<br>२) रकाना क्रमांक १ ते ११ मधील तपशील विचारात घेता शैक्षणिक कामगिरी समाधानकारक असल्याने / नसल्याने सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे./येत नाही. |

**अध्यक्ष**
**प्राचार्य**

**सदस्य**
**विषयतज्ञ**

**सदस्य**
**विषयतज्ञ**

**सदस्य सचिव**
**प्रशासकीय सेवक**